Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

23 March 2019, Special Issue- 168 (II)

# Globalisation : Challenges and Opportunities for India

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. Shivaji Dalnar
Principal
Punyashlok Ahilyadevi Holkar Mahavidyalaya,
Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

**Co-Editor**
Dr. Bonnar R.Y.
Dept. of Economics
PAH Mahavidyalaya, Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

Prof. Sonner V.B.
Dept. of Political Science
PAH Mahavidyalaya, Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

Scanned by TapScanner

# Index


1. महिला सशक्तिकरण और ग्रामीण विकास 11
डॉ.सुनीता श्रीवास्तव
2. विमुद्रीकरण का बेरोजगारी पर हुआ असर एक अध्ययन 14
प्रा. डॉ. सुर्यकांत पवार
3. भारतीय नक्षलवाद 16
प्रा. डॉ. सिद्धेश्वर शेटकर
4. "भारतातील नक्षलवाद" 18
कु. पुजा कमलाकर तिप्पणबोने
5. जागतिकीकरणाचे भारताच्या राजकीय व्यवस्थेवरील परिणाम 20
सुभाष पोले
6. वाढता दहशतवाद : भारतीय सुरक्षा व्यवस्थे समोरील एक प्रमुख अव्हान २३
प्रा. सोनवणे जी.एन
7. जागतिकीकरण आणि उच्च शिक्षणापुढील आव्हाने 25
प्रा. डॉ. विलास तुळशीराम ठाकूर
8. योगातुन आरोग्याकडे 27
डॉ. फड एल. एच.
9. "जागतिकीकरण आणि राष्ट्रीय सुरक्षेपुढील आव्हाने" 31
डॉ. बी. डी. तोडकर
10. 'जागतिकीकरण' वास्तव आणि अपरिहार्यता 35
डॉ.भुजंग विठ्ठलराव पाटील
11. भारतातील दहशतवाद ३८
गडदरे आनंदा बबन
12. "जागतिकीकरण आणि भारतीय संस्कृती" ४०
भिकाणे शोभा राजेंद्र
13. भारतातील शेतकरी आत्महत्या कारणे आणि उपाय 43
प्रा.डॉ. शिवाजी पाते
14. जागतिकिकरण आणि ई–बुक्स 46
संतोष किर्तनकार
15. जागतिकीकरण आणि सामाजिक समस्या : एक विश्लेषण 49
प्रा. डॉ. आनेराव एम. एम.
16. जागतिकीकरण आणि दारिद्र्य : एक अभ्यास 52
दलित सुभाषराव कांबळे , प्रा.डॉ. दिपक धारवाडकर
17. जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवर परिणाम 55
प्रा. डॉ. बी. एस. मुजमुले
18. जागतिकीकरणाचे भारतावरील परिणाम 58
प्रा. एन.आर. हुरगुळे
19. भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने 60
प्रा. के.जे. खंदारे
20. 'दहशतवाद' – भारतासमोरील आव्हान ६२
प्रा. रामप्रसाद व्हडगीर


Smt. Sindhutai Jadhav Mahavidyalaya Mehkar 330



Scanned by TapScanner

21. "भारतातील नक्षलवादी चळवळः महाराष्ट्रात नक्षल्यांचा शिरकाव आणि राज्यसरकारचे नक्षलविरोधी प्रयत्न" — 64
प्रा.भारतभुषण वामणराव बाळबुधे

22. जागतिकीकरण व भारतीय शेतकरी — 68
डॉ. सुभाष रामराव यादव

23. राष्ट्रीय आणि वैश्विक एकात्मतेत संगीताची भूमिका — 71
प्रा. डॉ. अर्चना संदीप देशपांडे

24. जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था — 74
प्रा. निलेष अरूण दुर्गे

25. जागतिकीकरण आणि मूलींचे शिक्षण — 78
जवळेकर रूपाली वसंतराव

26. जागतिकीकरण आणि भारतातील नक्षलवाद — 80
प्रा.कांबळे शिवाजी ई.

27. तथागत बुध्द आणि ताण तणाव व्ययस्थापन — 84
डॉ. बालाजी मा. गव्हाळे

28. जागतिकीकरण आणि मूल्यशिक्षण — 88
किर्तीराज चंद्रभानजी लोणारे, प्रा.डॉ. संघमित्रा गोणारकर

29. जागतिकीकरण आणि नागरी परिवर्तन — ९०
प्रा. डॉ. प्रशांत मेने

30. जागतिकीकरण – सामाजिक व कृषी क्षेत्रावर होणारे परिणाम — 95
प्रा. डॉ.दिपक सांबाप्पा देशमाने

31. जागतिकीकरण आणि वंचित समाज — 99
प्रा.डॉ.नरवाडे भास्कर विठ्ठलराव

32. पंडित नेहरूच्या नेतृत्वाखालील भारताची अलिप्ततावादी नीती – एक दृष्टीक्षेप — 101
प्रा.डॉ.पी.आर.जुनघरे

33. जागतिकरण आणि भारतीय स्त्रीयांचा राजकारणातील सहभाग — 104
प्रा. गजानन बाबुराव मरगीळ

34. जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील परिणाम — 106
प्रा.गडदे भारती बाबूराव

35. वैश्विक युग बोध की अभिव्यक्ति : तसलीमा नसरीन की कविता ('यह दुख : यह जीवन' के विशेष संदर्भ में) — 109
प्रा. डॉ. बंग नरसिंगदास ओमप्रकाश

36. जागतिकीकरण आणि भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने — 111
प्रा.डॉ.रामचंद्र गायकवाड

37. जागतिकीकरण व भारताचे आण्विक धोरण — 114
प्रा. रामकिशन सखाराम आवाड

38. मानसशास्त्रातील संधी आणि प्रचलित कल — 117
प्रा. डॉ. जी.पी. वायकोस

39. जागतिकीकरण आणि दलित–आदिवासी कविता — 119
डॉ. शत्रुघ्न जाधव

40. मानसिक आरोग्य आणि ताण–व्यवरथापन — 123
प्रा. डॉ. प्रज्ञा एस. जुनघरे

41. जागतिकीकरणाचे भारतीय उद्योगावरील परिणाम — 125
लोडे परमेश्वर लिंबाजी


Smt. Sindhutai Jadhav Mahila Mehkar 330



Scanned by TapScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (II) | March 2019 | UGC Approved No. 40705
Agriculture & Water Management in Historical Period in India

# पंडित नेहरूच्या नेतृत्वाखालील भारताची अलिप्ततावादी नीती – एक दृष्टीक्षेप

प्रा.डॉ.पी.आर.जुनघरे
इतिहास विभाग प्रमुख, श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय मेहकर जि बुलडाणा

**प्रस्तावणाः–**

स्वतंत्र भारताची परराष्ट्रनीती स्वातंत्र्य प्राप्तींनंतर निष्चित केल्या गेली किंवा दुसऱ्या जागतिक महायुध्दाच्या समाप्तीनंतर जग दोन परस्परविरोधी राष्ट्रगटात विभागले गेले असल्याच्या जानीवेतून निर्माण झाली असे नाही. तर भारताच्या स्वातंत्र्यचळवळीतून ती स्वाभाविकपणे साकार होत गेली. स्वांतत्र्यलढयाचे काळात पंडित जवाहरलाल नेहरू अधूनमधून परदेषी जात होते. आतंरराष्ट्रीय परिषदामध्ये कॉंग्रेसचे बिनसरकारी प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहत. त्यामुळे अनेक देषांच्या राष्ट्रप्रमुखांषी त्यांचे संबंध येत होते. निरनिराळया देषातील परिस्थिती व अडचणी यांची माहीती त्यांना झाली व त्यामधुन आंतरराष्ट्रीय नीती बाबतचा त्यांचा दृष्टीकोण व्यापक होत गेला. स्वतंत्र भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची रूपरेषा कॉंग्रेसने वेळोवेळी पारित केलेल्या ठरावातून स्पष्ट होत होती. साम्राज्यवाद व वर्णभेद याविरूध्द जगांत सुरू असलेली जनआंदोलने आणि भारतातील स्वातंत्र्य चळवळ यांचे स्वरूप सारखेच आहे. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढा स्वातंत्र्यासाठी धडपडणाऱ्या सर्वांना मार्गदर्षक ठरू षकतो. भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीबरोबर जगाच्या इतिहासांत एका नव्या युगाला सुरूवात होईल असा विष्वास त्यांना वाटत हाता. तसेच शतकानुषतकाची भारताची पंरपरा शांततेची व सहिष्णूतेची होती म्हणून द्वेष ,मत्सर, भिती व युध्दे याने गुदमरलेल्या जगाला सुखषांततेचा जीवनदायी संदेष देण्याचे व जागतिक राजकारणाला आधारभुत ठरेल असा नैतिक मुल्यांचा आदर्ष निर्माण करण्याचे महत्वपूर्ण कार्ये भारताला करावयाचे असा विचार स्वतंत्र भारताच्या नेतृत्वासमोर होता.

**1) स्वतंत्र भारताची अलिप्ततावादी भूमिकाः–**

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला त्यावेळी दिर्घकाळ ब्रिटीष राजवटीने केलेल्या अनन्वित शोषणामुळे भारतात अठराविष्वे दारिद्रय अस्तित्वात होते .प्रचंड प्रमाणातील निरक्षरता, अवाढव्य लोकसंख्या आणि खंडपाय विस्तार असलेला भारत राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेला व अविकसित होता जगातील प्रगत व सक्षम राष्ट्राच्या मदतीषिवाय भारताचा सर्वांगिण विकास साधने शक्य नव्हते त्यामुळे हंगामी सरकारची सुत्रे हाती घेतल्यानंतर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूनी 7 सप्टेंबर 1946 रोजी आकाषवाणीवरील भाषणात भारताच्या परराष्ट्रधोरणाची भूमिका स्पष्ट केली. " कोणत्याही एका विषिष्ट राष्ट्राचा उपग्रह म्हणून न राहता आम्ही एक स्वतंत्र राष्ट्र या नात्याने आंतरराष्ट्रीय परिषदामध्ये भाग घेउ, जागतीक शांतता व स्वातंत्र्य या उदिष्टासाठी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याची आमची इच्छा आहे. आम्ही सत्तागटाचे राजकारणापासून अलिप्त राहू इच्छितो "पंडित नेहरूच्या या भाषणात अलिप्त तावादाची बिजे स्पष्टपणे आढळतात.

**2) स्वतंत्र भारताच्या परराष्ट नीतीचे उदिष्टये :–**

आपल्या प्रादेषिक अखंडत्वाचे, स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाचे रक्षण करणे, नीतीनिर्धारणांचे स्वातंत्र्य टिकविणे, प्रगत राष्टांकडून भांडवल व तंत्रज्ञानाची मदत मिळवून लवकरात लवकर भारताचा आर्थिक विकास साधने, प्रगत व संपन्न राष्ट्राकडून भांडवल, यंत्रसामुग्री, तंत्रज्ञान व मार्गदर्षन यांची मदत मिळविण्याचे हेतूने सर्व राष्ट्राषी मैत्रीपुर्ण संबंध प्रस्थापीत करून परस्पर सहकार्ये वाढविणे, साम्राज्यवाद, वसाहतवाद,वंषभेद, वर्णभेद याविरूध्द लढा देणे, युध्दाचा धिक्कार करून जागतिक शांतता टिकविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे, अमेरीका व रषिया या परस्पर विरोधी बलाढय महासत्ताना तोंड देण्यासाठी आवष्यकता भासल्यास त्या दोन सत्तागटामध्ये यषस्वी मध्यस्थी करण्यासाठी तिसऱ्या शक्तीची आवष्यकता होती. म्हणून पंडित नेहरूनी भारताचे परराष्ट्रधोरण निष्चित करतांना अलिप्ततावादी नीतीचा अवलंब केला.

**3) भारताच्या अलिप्ततावादी धोरणांचे स्वरूप व अर्थ :–**

भारताच्या अलिप्ततावादाचे धोरण स्पष्ट करतांना पंडित नेहरू म्हणाले "अलिप्ततावाद म्हणजे जगातील दोन्ही लष्करी गटापासून अलिप्त राहणे होय. परंतु जगाच्या पाठीवर स्वातंत्र्यासाठी संघर्ष चालु असताना त्यापासून स्वतःला अलंग ठेवणे नव्हे" भारताने स्विकारलेला अलिप्ततावाद पुर्णतः वेगळया स्वरूपाचा होता .स्वातंत्र्योत्तर भारताला राष्ट्रउभारणीसाठी शांततेची नितांत आवष्यकता होती. महासत्तानी निर्माण केलेल्या लष्करी गटापासून अलिप्त राहील्यामुळेच भारताच्या स्वातंत्र्याचे व सार्वभौमत्वाचे संरक्षण होवू शकेल याबाबत भारतीय नेत्यांना विष्वास होता. स्वतःचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी जगातील सत्तास्पर्धेच्या राजकारणापासून अलिप्त राहणे आणि ज्या संघर्षाषी आपला प्रत्यक्ष संबंध पोहचत नाही. अषा वादापासून कटाक्षाने दुर राहणे म्हणजे अलिप्ततावादी धोरण होय. तथापि जगाच्या पाठीवर कुठेही स्वातंत्र्यप्राप्तीसाठी चालु असलेल्या स्वातंत्र्यलढयापासून भारत अलिप्त राहीलेला नाही. अषा स्वातंत्र्यलढयांना भारताने आपला पाठीबा, प्रोत्साहन व मदत दिली आहे याचा अर्थ अलिप्ततावाद म्हणजे कायम तटस्थता नव्हे. भारताच्या अलिप्तता धोरणाचा अर्थ स्पष्ट करताना अमेरीकन परराष्ट्र सचिव अदलाई स्टीव्हन्सन याच्या प्रष्नाला उत्तर देताना प.नेहरू म्हणाले " कोणत्याही राष्ट्राषी किंवा राष्ट्रगटाषी भारताने स्वतःला बांधून न घेणे निरनिराळया समस्याचा स्वतंत्रपणे विचार करून निर्णय घेणे आणि सर्व राष्ट्राषी मैत्री व सहकार्याचे संबंध प्रस्थापित करणे हा अलिप्ततानीतीचा खरा अर्थ आहे.

**4) अलिप्ततावादी धोरणाची वैषिष्टये :–**

- **लष्करी गटापासुन व लष्करी करारापासून अलिप्त :–**

150 वर्षापूर्वी विकसनषील अवस्थेत असतांना अमेरिकेने जागतिक राजकारणापासून अलिप्त राहण्याचे धोरण अवलंबिले होते तेच धोरण भारताने स्वतःच्या सर्वांगिण विकासासाठी शांततेची, सार्वभौमत्वाची, स्वयमनिर्णयाची नितांत आवष्यकता असल्यामुळे स्विकारले .या धोरणानूसार अमेरिका व रषिया पुरस्कृत लष्करी करारात सहभागी होण्यास भारताने नकार दिला. या लष्करी करारापासून अलीप्त राहून स्वतंत्रपणे आपले धोरण आखून कृतीत आणणे भारताच्या अलिप्ततावादी नीतीचे वैषिष्टये होते .



Scanned by TapScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (II) | March 2019 | UGC Approved No. 40705
Agriculture & Water Management in Historical Period in India

**❁ शांततेचे धोरण:–**

राष्ट्रहीतासाठी व शांततेसाठी अलिप्ततावादी राष्ट्र कोणत्याही एका राष्ट्रगटाषी संलग्न झाल्यास आपोआपच दुसऱ्या राष्ट्रगटाषी शत्रुत्व निर्माण होणार ही गोष्ट स्पष्ट होती. तसे होणे शांततेच्या दृष्टीने घातक ठरले असते. सर्व राष्ट्राषी मग ते कोणत्याही सत्तागटातील असोत मैत्रीपुर्ण सलोख्यांचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी अलिप्ततावादी नीती फायदेषीर ठरणार होती. मात्र कोणतीही किंमत देवून शांतता हे तत्व अलिप्ततेच्या धोरणात बसत नाही. युध्द, युध्दसदृष्य परिस्थिती, घातक तणाव, यापासून दूर ठेवून शांतता प्रस्थापित करणे अलिप्ततेच्या धोरणात अंतर्भुत नाही.

**❁ स्वातंत्र्य व सार्वभौमत्व :–**

जागतिक महासत्तेच्या पुढाकाराने व प्रभावाखाली स्थापन झालेल्या लष्करीगटात सामील झालेल्या छोटया मोठया राष्ट्राचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व कालांतराने नाममात्र राहते. महासत्तेच्या मर्जीनुसार त्याला अगतिकपणे वाटचाल करावी लागते. आणि वेळ आली तर सत्ता संघर्षामुळे उदभवणाऱ्या युध्दात नामषेष व्हावे लागते. म्हणून पंडित नेहरूनी राजकिय सुज्ञपणा दाखवून अलिप्ततावादी धोरणाचा अवलंब करून आपले स्वातंत्र्य व सार्वभौमत्व अबाधित राखले.

**❁ निर्णय स्वातंत्र्य :–**

भारताच्या अलिप्ततावादी धोरणाचे स्वरूप नकारात्मक नसुन ते सुनिष्चित गतिमान धोरण आहे. कोणत्याही लष्करीगटात अथवा षितयुध्दात भारत स्वतःला गुंतवून घेणार नाही एवढया पुरतेच मर्यादित नसून या धोरणामुळे भारताला कोणत्याही आंतरराष्ट्रीय समस्येबाबत सारासार विचार करून स्वतः ला योग्य वाटणारा निर्णय स्वतंत्रपणे घेवून त्याचा ठामपणे पाठपुरावा करता आला. साम्राज्यवाद, वसाहतवाद, वंषभेद, वर्णभेद अषा आंतरराष्ट्रीय समस्याबाबत स्वतःची मते मांडता आली. 1950 मध्ये कोरीयन युध्द उदभवले त्यावेळी उत्तर कोरीया आक्रमक असल्याचे मत भारताने ठामपणे मांडले.इ.स. 1856 मध्ये इग्लंड व फ्रान्सने इजिप्तवर केलेल्या हल्याचा निर्भिडपणे निषेध केला. युनोच्या आदेषानुसार शांतता रक्षणार्थ ठिकठिकानी भारतीय सैन्य पाठविले .

**❁ सहकार्य व सहजीवनाचे धोरण:–**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने जवळपास सर्व राष्ट्राषी राजनैतिक संबंध प्रस्थापीत केले. युनोच्या सर्व घटकसंस्थांचा भारत सकीय समासद आहे. राष्ट्रकुलाचे सभासदत्व सुध्दा भारताने कायम ठेवले आफ्रो– आषियाई राष्ट्राची संघटना स्थापन करून कोलंबो योजना यषस्वी करण्यात भारताचा वाटा सिंहाचा आहे. थोडक्यात अलिप्ततावादी धोरणाचा आधार सहकार्य व सहजीवनाचा आहे. अलिप्ततावादी राष्ट्राची संघटना निर्माण करण्यामागे भारताची भूमिका तिसरी शक्ती निर्माण करण्याची नाही ही गोष्ट नेहरूनी वारंवार स्पष्ट केली.

**5) अलिप्ततावाद व पंचषील :–**

प.नेहरूच्या मते भूतकालीन कटू स्मृती, युध्दाच्या व संघर्षाच्या स्मृती घोळवत न बसता परस्पर सहकार्याचे नवे पर्व प्रयत्नपुर्वक सुरू केले पाहीजे. आपल्याच विचार सरणीचा दुराग्रह न धरता व त्यांना आंतरराष्ट्रीय आदान प्रदानीत अडसर होवू न देता प्रत्येक राष्ट्राने परस्परांच्या कामकाजात अतिरिक्त हस्तक्षेप टाळावा. आंतरराष्ट्रीय वर्तनाला मार्गदर्षक ठरेल अषी पाच तत्वाची प्रणाली नेहरूनी सुचवली. तिलाच पंचषील तत्वे असे म्हणतात. स्वतंत्र भारताने आपल्या विदेषनीतीमध्ये या पंचषील तत्वाचा पुरस्कार केला 1) परस्पराच्या राजकीय सार्वभौमत्वाचा आणि प्रादेषिक अखंडत्वाचा सन्मान 2) कोणत्याही कारणास्तव परस्परावर आक्रमण करू नये 3) परस्परांच्या अतंर्गत कारभारात हस्तक्षेप करू नये . 4) समानता व परस्पर हितसंबंधाचे संरक्षण होईल असा व्यवहार 5) शांततामय सहजीवन स्थापन करण्याचा प्रयत्न

आंतरराष्ट्रीय सहकार्य व सदभाव वृध्दीगत होवून जागतिक शांतता टिकावी या प्रामाणिक हेतुने भारताने पंचषील तत्वाचा पुरस्कार केला. पंचषीलतत्वे आचरणात आणल्यास जगावरील भितीचे व अविष्वासाचे सावट नष्ट होईल. असा विष्वास पं. नेहरूना वाटत होता. आंतरराष्ट्रीयवादातुन अंतिमतः जगाचे संघराज्य स्थापन होईल.अषी खात्री नेहरूना वाटत होती. तत्कालीन परिस्थिती नेहरूना अस्वस्थ करीत होती म्हणून त्यांनी आंतराष्ट्रीय सहजीवन, सौजन्य, सहकार्य, सहानुकंपा व सदिच्छाच मानवाला याबाबतीत मदत करू शकतील असे नेहरूना वाटत होते. सुरूवातीला पंचषील तत्वाची चेष्टा झाली परंतु कालांतराने संपुर्ण जगाला नेहरूचे पंचषीलचे महत्व पटले.

**6) अलिप्ततावादास जागतिक मान्यता:–**

भारताचे अलिप्ततावादी धोरण आंतरराष्ट्रीय राजकारणात कायम टिकणारा विचार प्रवाह आहे. हि गोष्ट 1952–53 मध्ये स्पष्ट झाली. कोरीयन युध्दकाळात भारताची अलिप्ततावादी नीती आणीबाणीचा प्रसंगी मध्यस्थी करण्यासाठी स्वागतार्ह ठरू षकते याचा प्रत्यय अमेरिका व रषिया या महासत्ताना आला. सुरक्षा समितीमध्ये युध्दबंदीबाबत व युध्दकैदयाच्या अदलाबदली बाबत भारताने मांडलेला ठराव मंजुर झाला. कोरीयन प्रष्नाबाबत युनोने नियुक्त केलेल्या 20 तटस्थ राष्ट्राच्या मंडळाचे अध्यक्षपद भारताकडे आले. शस्त्रसंधी कराराची अमलंबजावणी बाबत लेफ्टनंट जनरल एस.पी.पी. थोरात यानी अद्वितीय कामगिरी बजावली. कोरीयन युध्दप्रसंगी भारताचे सहकार्य व न्यायभूमिका मोलाची ठरल्यामुळे भारताच्या अलिप्ततावादी नीतीच्या उपयुक्ततेबाबत रषिया व चीन याना विष्वास वाटू लागला तर अमेरीकेच्या नाराजीची धार बोथट झाली. अलिप्ततावादी धोरण राष्ट्रहिताचे दृष्टीने लाभदायक ठरू शकते तसेच अलिप्त राहणे सहज शक्य आहे असे लक्षात आल्यामुळे भारताच्या पाउलावर पाउल ठेवून अनेक राष्ट्रानी हया नीतीचा स्विकार केला.

**7) अलिप्ततावादी राष्ट्रांच्या गट निर्मितीस प्रारंभ :–** अलिप्ततावादी धोरण लाभदायक ठरू शकते. असे कोरियन युध्दावरून निर्माण

आतंरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टिने अलिप्ततावादी धोरण लाभदायक ठरू शकते. असे कोरियन युध्दावरून निर्माण झालेल्या परिस्थितीने स्पष्ट झाले.त्यामुळे हळुहळु नव्याने स्वतंत्र झालेली राष्ट्रे भारताकडे आकर्षित होउ लागली. जास्तीत जास्त राष्ट्रांनी असंलग्न राहवे, स्वतःला लष्करी करारात गुतवून घेउ नये असे आवाहन भारताने वेळोवेळी केले.त्यानुसार भारताच्या अलिप्ततावादी नीतीला पहिला पाठिंबा मिळाला तो अरब–अषियायी या राष्ट्राकडून. त्यानंतर युगोस्लोव्हियाचे [illegible] सोबत मतभेद निर्माण झाल्यानंतर आपली सैध्दांतिक भुमिका व राष्ट्रीय स्वातंत्र्य टिकवून ठेवण्याच्या गरजेपोटी युगोस्लोव्हिया भारताच्या



Scanned by TapScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN: 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (II) | March 2019 | UGC Approved No. 40705
Agriculture & Water Management in Historical Period in India

अलिप्ततावादी धोरणाकडे वळला. डिसेंबर 1954 मध्ये युगोस्लोव्हीयाचे मार्शल टीटो यांनी भारताला भेट दिली. आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील अनेक विवादय मुदयाबाबद दोन्ही राष्ट्रांची भुमिका समान असल्यामुळे त्यांच्यात जवळीक निर्माण झाली. त्यानंतर पंडित नेहरूनी जुलै 1954 मध्ये युगोस्लोव्हियाला भेट दिली. याच सुमारास इजिप्तचे शासक अब्दुल गमाल नासेर यांच्याशी नेहरूंचा निकटचा संबंध आला फेब्रुवारी 1955 मध्ये कैरो येथे यांची भेट झाली. लष्करी करारापासून अलिप्त राहण्याची दोन्ही राष्ट्रांची भुमिका समान असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर जुलै 1955 मध्ये त्या दोन नेत्यांची पुन्हा भेट झाली. त्यावेळी महासत्तासोबत लष्करी युती करणे जागतिक शांततेसाठी पोषक नाही म्हणुन भारत व इजिप्तने तसे करू नये असा स्वरूपाचा करार इजिप्त व भारत यांच्यात झाला. पुढे युगोस्लोव्हियाच्या ब्रिओनी बेटावर नेहरू, टिटो व नासेर हे तीन राष्ट्रप्रमुख एकत्रित आले आणि दोन्ही सत्तागटापासून अलिप्त राहण्याचा निर्णय त्यांनी घेतला. या तिन्ही राष्ट्रप्रमुखांचा हा निर्णय म्हणजे अलिप्तता चळवळीचा प्रारंभ होय.

**❁ अलिप्ततावादी राष्ट्रांची पहिली षिखर परिषद ( बेलग्रेड संमेलन इ.स.1961 )**

युगोस्लोव्हियांच्या ब्रिओनी बेटावर नेहरू, टिटो, नासेर हे तीन खंडातील नेते एकत्रित आले. इ.स. 1956 नंतरच्या दषकात आतंरराष्ट्रीय राजकरणातील घडामोडी मुळे त्यांच्यातील मैत्रीची भावना दृढमुल होत गेली. अमेरिका व रषिया यांच्यातील तणाव, अणुयुध्दाचा वाढता धोका, सुवेजचा प्रष्न, बर्लिन आणीबाणी इत्यादी सर्व गोष्टीमुळे अलिप्ततावादी नीतीची नितांत आवष्यकता हया नेत्यांना जानवू लागली. म्हणून त्यांनी अलिप्ततावादी राष्ट्रांना संघटीत करण्याचा निर्णय घेतला. त्याकरिता अलिप्तराष्ट्राची पहिली षिखर परीषद युगोस्लोव्हियाची राजधानी बेलग्रेड येथे सप्टेंबर 1961 मध्ये आयोजित केली. या षिखर परिषदेमध्ये भारत , इजिप्त, युगोस्लोव्हिया यांच्यासह जगातील 25 राष्ट्रांनी सहभाग घेतला. जगातील सर्व ठिकाणच्या वसाहती लवकरात लवकर स्वतंत्र व्हाव्यात यावर सर्वाचे एकमत झाले. तसेच अमेरिका व रषिया यांना अण्वस्त्र चाचण्या बंद करण्याची विनंती करण्यात आली. शांततामय सहजीवन व मैत्रीपुर्ण सलोख्याचे संबंध जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी अत्यावष्यक असुन या मार्गानेच लष्करीगटातील संघर्ष संपविता येईल. यावर ठाम विष्वास व्यक्त करण्यात आला. नेहरू टिटो व नासेरच्या व्यक्तीमत्वाचा ठसा बेलग्रेड परिषदेवर उमटला. त्याचबरोबर भारताच्या अलिप्ततावादी नीतीला जागतिक प्रतिष्ठा प्राप्त झाली.

**निष्कर्ष व सारांष :–**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या प्रादेषिक अखंडत्वाचे, स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाचे रक्षण करणे, नीती– निर्धारणाचे स्वातंत्र्य टिकविणे, प्रगत राष्ट्राकडून भांडवल व तंत्रज्ञानाची मदत मिळवून भारताचा आर्थिक विकास साधने. इत्यादी उदिष्टये समोर ठेवून स्वतंत्र भारताच्या नेतृत्वाने कोणत्याही सत्तागटात सामील न होता अलिप्ततावादी नीतीचा अवलंब केला. सुरूवातीला भारताच्या हया धोरणावर टिका झाली .परंतु कालातंराने नवस्वतंत्र झालेल्या सर्वच राष्ट्रांना, रषिया व अमेरिका हया महासत्तांना अलिप्ततावादी नीतीचे महत्व लक्षात आले. त्यांनी भारताच्या अलिप्ततावादी धोरणाला पाठींबा दिला. भारताचे अलिप्ततावादी धोरण आंतरराष्ट्रीय राजकारणात कायम टिकणारा विचार प्रवाह आहे. आणीबाणीच्या प्रसंगी भारताची मध्यस्थी उपयुक्त ठरू शकते याचा प्रत्यय दोन्ही महासत्तांना कोरीयन युध्दाच्या प्रसंगी आला. अलिप्ततेचे धोरण दुबळयांचा आक्रोष नसुन जागतिक महासत्ता बनण्याच्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या शांतताप्रिय व सामर्थ्यसंपन्न राष्ट्रांचे जागतिक शांततेला पोषक ठरणारे सुनिष्चित धोरण आहे. अलिप्ततावादी धोरण शांतता निर्माण करण्यासाठी उपकारक ठरते. आतंरराष्ट्रीय समस्येबाबत आपण स्विकारलेली भुमिका योग्य आहे याची खात्री अलिप्ततावादी राष्ट्रास असल्यास एक प्रकारे त्याला नैतिक आत्मिक बळ प्राप्त होते. पंडित नेहरू,मार्षल टिटो व नासेर, या त्रिमूर्तीनी युगोस्लोव्हियाची रजधानी बेलग्रेड येथे इ.स. 1961 मध्ये अलिप्तराष्ट्राची पहिली षिखर परिषद आयोजित केली. त्यावेळी अलिप्तराष्ट्रांची सभासद संख्या 25 एवढी होती. पुढे 1990 मध्ये ती संख्या शंभर पर्यंत जावून पोहचली अलिप्तराष्ट्राचा गट आर्थिकदृष्टया सामर्थ्यसंपन्न किंवा लष्कारी दृष्टया प्रबळ नसला तरी हया तिसऱ्या जगाच्या आस्तित्वाची दखल घेणे जागतीक महासत्तांना भाग पडले यावरून अलिप्ततावादाची ताकद स्पष्ट होते. अलिप्तता चळवळीचे जनक असलेल्या भारताची भुमिका यामध्ये महत्व पुर्ण असल्याचे लक्षात येते.

**संदर्भग्रथः–**

1) आचार्य डॉ.धंनजय, आधुनिक भारत (1750 ते 1971 ) , श्री साईनाथ प्रकाषन नागपूर .
2) कोठेकर डॉ.शांता , आधुनिक भारताचा इतिहास (1947 ते 2000 ), श्री साईनाथ प्रकाषन नागपूर
3) ग्रोव्हर,बेल्हेकर , आधुनिक भारताचा इतिहास, एस चंद आणि कंपनी लिमिटेड , रामनगर नवी दिल्ली.
4) कदम य.ना. , समकालीन आधुनिक जग, फडके प्रकाषन, कोल्हापूर.
5) भोळे डॉ. भास्कर लक्ष्मण, आधुनिक भारतातील राजकिय विचार , पिंपळापूरे ॲण्ड पब्लीषर्स , महाल नागपूर.
6) पवार डॉ. जयसिंगराव, भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास ,फडके प्रकाषन, कोल्हापूर.

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana

330



Scanned by TapScanner